# जाहिरात

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जळगांव या कार्यालयांतर्गत देखभाल दुरूस्ती कक्षाकरीता कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करारतत्वावर एकत्रित मानधनावर डाटा एन्ट्री ऑपरेटर हे पद बाह्यस्त्रोताव्दारे भरण्याकामी जाहिरातीत नमुद केलेली अर्हता धारण केलेल्या पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्रं. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|
| १ | डाटा एन्ट्री ऑपरेटर पद-१ | किमान अर्हता :- <br>१) कोणत्याही शाखेची मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी किमान ५० टक्के गुणासह(गणित किंवा सांख्यिकी विषय घेवुन पदवी उत्तीर्ण असणा-यास प्राधान्य) <br>२)MSCIT प्रमाणपत्रधारक (विंडोज व इंटरनेटचे ज्ञान असणे आवश्यक) <br>३)स्वंयसेवी संस्था अथवा शासकीय विभागामधील डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाचा – २ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य <br>४) मराठी व इंग्रजी टायपिंग (मराठी ३० शब्द प्रति मिनीट व इंग्रजी ४० श.प्र.मि.) असल्यास प्राधान्य | दरमहा मानधन रक्कम रुपये ८०००/- |

## सर्व साधारण अटी व शर्ती

१) सदर नेमणुक फक्त ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर करण्यात येईल या सेवेच्या आधारावर नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. असा करारनामा निवड झाल्यावर उमेदवाराने रक्कम रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करुन देणे बंधनकारक राहिल.

२) जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी व ४० पेक्षा जास्त नसावे.

३) नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक २२/०२/२०१९ ते दि २८/०२/२०१९ या कालावधीत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जळगांव या कार्यालयात सादर करावेत.

४) अर्ज केलेल्या उमेदवारांच्या अर्जांची निकषानुसार पात्र/अपात्र अशी छाननी केली जाईल. छाननी केलेल्या अर्जाची पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारांना मौखिक परिक्षेसाठी स्वंतत्ररित्या कळविण्यात येईल. अपात्र उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे लेखी कळविले जाणार नाही.

५) नेमणुक कालावधी सपंण्यापुर्वी नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव यांनी राखुन ठेवलेला आहे.

६) नेमणूक कालावधी संपल्यानंतर संबंधित उमेदवार यांची सेवा संपुष्टात येईल व पुढील सेवा सातत्याबद्दल कोणताही हक्क राहणार नाही.

७) अर्जासोबत वर नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या सत्य प्रति जोडणे आवश्यक आहे. उमेदवाराने आपला पत्ता ठळक अक्षरात गांव,तालुका,जिल्हा इ. स्वहस्ताक्षरात नमुद करावा.

८) अर्जासोबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.जळगांव यांच्या नांवाने राष्ट्रीयकृत बॅकेचा रक्कम रुपये ३००/-चा डी.डी.जोडावा.

९) जाहिरातीप्रमाणे भरती प्रक्रिया स्थगिती अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१०) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या दरमहा एकत्रीत मानधनामध्ये शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार वाढ करणेत येईल.

११) सदर पदासाठी आवश्यक असलेला विहीत अर्जाचा नमुना जि.प.जळगांवच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जळगांव येथेही उपलब्ध आहे.

**खालील उणिवा असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.**

१) विहीत शैक्षणिक पात्रता धारण न करणारे, २) रक्कम रुपये ३००/-चा डी डी नसलेले अर्ज, ३) फोटो नसलेले अर्ज
४) दिलेल्या विहित नमुन्यात नसलेले अर्ज, ५) अपुर्ण किंवा चुकीचा मजकुर असलेले अर्ज, ६) स्वाक्षरी नसलेले अर्ज
७) आवश्यक गुणपत्राच्या व प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रति नसलेले अर्ज तसेच माहिती योग्यरित्या न भरलेले अर्ज

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद जळगांव**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,जळगांव**

13/2

Scanned by CamScanner

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प.जळगांव अंतर्गत देखभाल दुरूस्ती कक्षात ११ महिन्यांसाठी करार पध्दतीने कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर पदासाठी सादर करावयाचा अर्जाचा नमुना**

**प्रति,**

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद जळगांव**

स्वतःचा सांक्षांकित केलेला फोटो

१) पदाचे नांव :- ----------------------------------------

२) उमेदवाराचे नांव :- ----------------------------------------

३) पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता :- ----------------------------------------

४) दुरध्वनी क्रमांक :- ----------------------------------------

५) जन्म तारीख :- ----------------------------------------

६) जाहिरात प्रसिध्द दि. / /२०१९ रोजीचे वय वर्ष ------- महिने ------- दिवस -------

७) शैक्षणिक अर्हता : -

| अ.क्र | परिक्षेचे नांव | संस्था/बोर्ड/ विद्यापीठाचे नांव | विषय | परिक्षेत मिळालेले एकुण गुण | एकुण टक्केवारी | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

८) व्यावसायिक अर्हता :- ----------------------------------------

९) अनुभव :- ----------------------------------------

१०) डी.डी. चा तपशिल :-

| अ.क्र | बँकेचे नांव व ठिकाण | डी.डी.क्रमांक | डी.डी.चा दिनांक | डी.डी.ची रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) अर्जा सोबत जोडलेल्या सांक्षांकित छायांकित कागदपत्रांची यादी :-

१) ---------------------------------------- २) ----------------------------------------
३) ---------------------------------------- ४) ----------------------------------------
५) ---------------------------------------- ६) ----------------------------------------

मी ---------------------------------------- या अन्वये प्रतिज्ञापुर्वक असे जाहिर करतो /करते की वरील माहिती जाणीव पुर्वक तसेच विचारपुर्वक दिली असुन ती सर्व खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. वरीलपैकि कोणतीही माहिती खोटी असल्यास व त्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतुन कमी केल्यास त्याबाबत माझी काहि तक्रार राहणार नाही. या अर्जाद्वारे दिलेली माहिती खोटी आढळल्यास ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प.जळगांव माझेविरूध्द कायदेशिर कार्यवाही करू शकता याची मला पुर्णपणे जाणीव आहे.

**आपला विश्वासू**

(------------------------)

Scanned by CamScanner